## चकवा - भाग १

हातातली छोटी हॅन्डबॅग आणि अंगावरची ओढणी सांभाळत अस्मिता एसटीमध्ये चढली. आपली ओढणी तिने अंगाभोवती लपेटून घेतली होती. बोचऱ्या वाऱ्यापासून बचाव करण्यासाठी तिने ती अशी लपेटली असावी असंच कुणालाही वाटलं असतं. पण ते नुसतं निमित्त होतं. खरं तर खांद्यावर आणि छातीवर फाटलेल्या ड्रेसमधून डोकावणारी आपली अब्रू तिनं ओढणीत झाकायचा प्रयत्न केला होता.

एकएक करत सगळे प्रवासी एसटीमध्ये चढले आणि एसटी रत्नागिरीच्या दिशेनं धावू लागली. कंडक्टरने एकदा सगळ्या सीटवरून नजर टाकली आणि तो त्याच्या सीटवर जाऊन बसला. एसटीमधल्या दिव्यांचा प्रकाश आता मंदावला होता. काही वेळाने आतले दिवे पूर्ण बंदच झाले. बाहेरच्या अंधाराला भेदत एसटीने वेग घेतला होता. बहुतेक प्रवासी आता झोपेच्या अधीन झाले होते.

अस्मिताच्या मागच्या सीटवर एक तरुण जोडपं त्यांच्या दोन वर्षाच्या मुलाला घेऊन बसताना तिनं पाहिलं होतं. तो छोटा काही अजून झोपला नव्हता. त्याची कुरकुर चालू होती. त्याच्यामुळे बाकीच्यांची झोपमोड होऊ नये म्हणून अखेर त्याच्या आईनं अगदी हळू आवाजात अंगाईगीत गुणगुणायला सुरुवात केली.

तिच्या गुणगुणण्याने अस्मिताला अनयची आठवण अधिकच तीव्रतेने येऊ लागली... अनयला झोपवताना जनी अशीच गुणगुणत असे...मुकी जनी... बोलता येत नव्हतं, पण तिला स्वरांचं ज्ञान उपजत होतं.

अनयला आपल्यापेक्षा जनीचा जास्त लळा आहे हे अस्मिताला माहीत होतं.

डॉक्टर अशोकशी लग्न करून अस्मिता पुण्याहून रत्नागिरीला आली होती. नव्याची नवलाई - छोटेखानी बंगला, प्रेमळ आणि तिला लेकीसारखं जपणाऱ्या सासूबाई आणि बंगल्यातच मागच्या बाजूच्या खोलीत राहणारी मुकी जनी असा अस्मिताचा संसार सुरू झाला होता.

पुण्यासारख्या गजबजलेल्या शहरातून रत्नागिरीला आल्यामुळे अस्मिताला प्रथम शांत, निवांत, संथ वाटलं होतं. पण डॉक्टर अशोकच्या प्रेमाच्या वर्षावात ही शांतता त्यावेळी तिला विशेष जाणवली नाही.

बंगाल्याची साफसफाई, कपडे-भांडी करायला विठा येई. बंगल्याभोवतीच्या बागेला आणि झाडांना पाणी घालायला माळी होता. बाकी नाश्ता, जेवण, इतर आवरआवर असं जनी करत असे. अस्मिताला आपण अगदी राजाच्या राणीसारखं सुखात लोळतोय असंच सुरुवातीला वाटलं. दिवसभर तिला काम असं काही नसायचंच. डॉक्टर स्वतःची डिस्पेंसरी आणि शिवाय तिथल्या

हॉस्पिटलमध्येही प्रॅक्टिस करत होते. सहाजिकच त्यांना कामाचा भरपूर व्याप होता. अस्मितासाठी त्यांना फारसा वेळ देता येत नव्हता.

अस्मिताने मग हळूहळू जनीशी दोस्ती जमवायला सुरुवात केली. जनीची खाणाखुणांची भाषा ती शिकली. आता तिला ती भाषा कळूही लागली होती. जनीची सुरांची जाण पाहून अस्मिताने घरातल्या रेकॉर्डप्लेअरवर तिला गाणी ऐकवायला सुरुवात केली. अशोकच्या आईंनाही हे आवडलं. जनी जन्मापासून मुकी नव्हती. ती तीन-चार वर्षाची असताना एक अपघात घडला आणि त्यामुळे तिच्या स्वरयंत्रावर आघात झाला होता. अस्मिताला हे समजले तेव्हा तर तिला जनीबद्दल फारच कीव वाटू लागली. दुपारी सवड असेल त्यावेळी जनीला पुस्तक वाचून दाखवायला तिने सुरूवात केली. जनीलाही नव्या वहिनींचं फार अप्रूप, कौतुक वाटे.

बाहेर अंधाराच्या सावल्या दाटून आल्या होत्या. एसटीने आता वेग घेतला होता.

त्या अंधारात गतकाळच्या आठवणी अस्मिताच्या मन:पटलावर उमटून आघात करत होत्या. एखाद्या पिशाच्चासारख्या त्या आता तिला भेडसावू लागल्या...

चार वर्षे उलटली त्या गोष्टीला...

चार वर्षापूर्वी अस्मिता डॉक्टर अशोकचं घर सोडून, राहुलबरोबर रत्नागिरी सोडून मुंबईला आली होती. राहुल तिचा कॉलेजमधला मित्र आणि प्रियकर सुद्धा. त्या दोघांचं अफेअर त्यांच्या ग्रुपला माहीत होतं. राहुलच्या आईलाही ते माहीत होतं. सून म्हणून तिला अस्मिता पसंत होती. दोघंही बी.कॉम. फायनल इयरला होते. एक्झाम झाल्यानंतर नोकरी लागली की अस्मिताच्या घरी सांगायचं. मग साधेपणाने लग्न करून संसार थाटायचा असा दोघांचा विचार होता.

कॉलेजमध्ये गॅदरिंगच्या वेळी नाटकातून काम करायचं, नाटक बसवायचं, दिग्दर्शन करायचं ह्या साऱ्याची राहुलला आवड होती. तो दिसायला देखणा होता. नट होण्याचं पोटेन्शियल त्याच्यात होतं. अभिनयाची आवड होती, तशी जाणही होती.

बी.कॉम.च्या फायनल एक्झामला फक्त एक महिना बाकी होता. सर्वजण एक्झामच्या मूडमधे अभ्यासात गुंतले होते. आणि एक दिवस अचानक अस्मिताने सर्वांसमोर तिचं लग्न डॉक्टर अशोक बरोबर ठरलं असं सांगून बॉम्बस्फोट केला. अस्मिताच्या मावशीच्या नात्यातल्या डॉक्टर अशोकनी तिच्या मावशीमार्फत तिला मागणी घातली होती.

अस्मिताने ग्रुपमध्ये हे जेव्हा सांगितलं त्यावेळी राहुल भयंकर चिडला होता.

तो तिला म्हणाला होता, “आपली एक्झाम झाल्यानंतर तुझ्या आई-बाबांना आपण आपल्याबद्दल सांगायचं असं ठरलं होतं ना? मग हे सगळं असं अचानक कसं, कधी ठरलं? तुझ्या घरच्यांनी तुझ्या मर्जीविरुध्द हे ठरवलंय का? तू काही ऑब्जेक्शन घेतलं नाहीस का त्यावर?”

ह्यावरचं तिचं उत्तर ऐकून राहुलचा नुसता संताप संताप झाला होता.

ती म्हणाली होती, “त्यांनी मला  मावशीकडच्या फंक्शनमध्ये पाहिलं होतं दोन-चार वेळा. मी त्यांना आवडले होते. म्हणून मावशीकरवी त्यांनी मागणी घातली. त्यांचे बाबा पण डॉक्टर होते. ते मागच्या वर्षी अचानक वारले. त्यांना वर्षाच्या आत लग्न करायचं आहे, म्हणून मग लगेचची तारीख ठरवलीय. माझ्या बाबांना, रादर आमच्याकडच्या सगळ्यांनाच वाटतंय, डॉक्टर अशोकचं स्थळ माझ्यासाठी अगदी योग्य आहे. रत्नागिरीला असतात ते. तिथे त्यांचा स्वतःचा दवाखाना, बंगला, गाडी, सर्व आहे.”

“अच्छा! म्हणजे त्यांचा पैसा- बंगला, गाडी या सगळ्याचा तुला मोह पडला म्हण की! काहीही ओळखदेख नसलेल्या माणसासोबत तू तुझं आयुष्य बांधायला निघाली आहेस? आणि माझं काय? माझ्याशी प्रेमाचं नाटक खेळत होतीस का?” त्याचा राग साहजिकच होता.

त्यावर तिनं तेव्हा म्हटलं होतं, “कसं आहे ना राहुल, प्रपोजल आलं तेव्हा मी पण खूप विचार केला. आणि तसं म्हणशील तर अशोक अगदीच अनोळखी नाही म्हणता येणार. पूर्वी एक-दोनदा पाहिलं होतं त्याबद्दल नाही म्हणत मी. पण मागच्या महिन्यात हे सर्व ठरत असताना दोन दिवस घरचे आम्ही सर्व रत्नागिरीला त्यांच्या घरी राहून आलो. आम्ही आमच्या कुलदैवताला जातोय असं सांगून गेले होते ना मी, ते खोटं बोलले होते तुझ्याशी. आम्ही रत्नागिरीला गेलो होतो. त्यावेळी त्यांच्याशी जवळून परिचय झाला. खूप लाघवी स्वभाव आहे त्यांचा. आमचं छान जुळेल याची खात्री वाटतेय मला. लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधलेल्या असतात असं बाबा म्हणाले तेही पटलं मला. परीक्षा संपल्यानंतर पंधरा दिवसांनी लग्नाचा मुहूर्तही काढलाय घरच्यांनी.”

ती राहुलला चिडवायला असं सांगतेय असंच सगळ्यांना आधी वाटलं.

पण हे खरं असल्याची पक्की खात्री झाली तेव्हा विखार ओकणाऱ्या डोळ्यांनी तिच्याकडं पहात राहुल म्हणाला होता, “चालती हो माझ्या डोळ्यासमोरून!”

राहुलच्या आईने आणि मित्रांनी त्याला त्यावेळी सावरलं होतं. त्याने बी.कॉम.ची फायनल एक्झाम दिली नाही एवढंच तिला कळलं होतं. तो काय करतो, कुठे असतो, हेही तिने कुणाला विचारले नव्हते. त्याची चौकशीही कुणाकडे केली नव्हती. मित्र-मैत्रिणींचे कधी फोन झाले तरी राहुलबद्दल कुणीच तिच्याजवळ बोलत नसे. ग्रुपमध्ये कुणालाच तिनं राहुलला दुखवून डॉक्टर अशोक बरोबर लग्न करणं आवडलं नव्हतं.

आयुष्यात स्थैर्य, सुख पाहिजे ह्या कल्पनेनं ती डॉक्टर अशोकशी लग्न करून आली होती. डॉक्टर तिच्यापेक्षा वयाने सात-आठ वर्षांनी मोठे होते. ते तिच्यावर खूप प्रेम करत. तिची काळजी

घेत. तरीही तिच्या आणि डॉक्टरांच्या नात्यात मैत्र असं कधी फुललंच नाही. डॉक्टर देखणे असले, मनमिळाऊ स्वभावाचे, समजूतदार असले तरी बरोबरीच्या मित्रासारखं नातं आपल्यात नाही. वेडं होऊन पावसात भिजणं, कधी जोक ऐकून उगीचच हसणं ह्या सगळ्या आनंदाला ती आता मुकली होती. मनातली खंत तिला बेचैन करत होती.

तिला मग राहुलची आठवण येई. कॉलेजचे दिवस, कॅन्टिनमधला अड्डा, तिथे रंगलेल्या चर्चा आणि वाद... ती राहुलला विसरू शकत नव्हती. मग कधीकधी ती चिडचिडी होई. उगीचच आदळआपट करे. डॉक्टर अशावेळी तिच्याशी जास्तच प्रेमाने वागत. पण तिला त्यांचं प्रेमही नको वाटे. मात्र लवकरच बाळाच्या आगमनाची तिला चाहूल लागली. आणि या गोड बातमीने ती मोहरुन उठली. वारंवार येणारी राहुलची आठवण मग मागे पडली...

अनयच्या जन्मानंतर आता तिचा बराचसा वेळ अनयमध्ये जायचा. अस्मिता, अशोकच्या आई आणि जनी तिघींचा अनय म्हणजे वीक पॉइंट होता. त्याच्या सगळ्या वेळा सांभाळण्यात ती थोडी रमली. डॉक्टर मात्र त्यांच्या कामात खूपच व्यस्त झाले होते.

अनय मोठा होत होता. आता तो दुडुदुडु पावलं टाकू लागला होता. बोबडे बोल बोलू लागला होता.

(क्रमशः)

**लीना माटे**

leenashining@gmail.com